दिनांक 27/01/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.165

विषय – विटा नगरपरिषदेस सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना / नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना / महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत विकास कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 27/01/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) मा.आ.सुहास अनिलभाऊ बाबर विधानसभा सदस्य महाराष्ट्र विधानसभा यांचे दि.27/01/2025

विटा नगरपरिषदेस सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना / नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना / महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत करणेत येणारी विकास कामे खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.7 मधील संजय पाटील घर ते संभाजी शितोळे (चेंबर एरिया) रस्ता डांबरीकरण करणे.
2. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.7 मधील लवटे साहेब घर ते लक्ष्मण पवार घरापर्यंत बंदिस्त गटर व रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.
3. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.7 मधील सचिन देशमुख घर ते प्रकाश नागोजी घरापर्यंत आर.सी.सी. गटर व रस्ता डांबरीकरण करणे.
4. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.3 मधील गणेश शिंदे घर ते संदिप मंडले (मंडले वस्ती) घरापर्यंत आर.सी.सी. गटर करणे.
5. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.3 मधील मोहन मंडले घर ते ओढयापर्यंत (मंडले वस्ती) बंदिस्त गटर करणे.
6. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.3 मधील मंडले घर ते चव्हाण मॅडम (मंडले वस्ती) घरापर्यंत बंदिस्त गटर करणे.
7. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 7 मधील जैनकोप मिस्त्री घर ते दिपक पाटील घरापर्यंत बंदिस्त गटर व रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.
8. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.7 मधील गणपती मंदिर ते विकास पवार घरापर्यंत बंदिस्त गटर व रस्ता डांबरीकरण करणे.
9. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.11 मधील झहिराबी घर ते अलहुसर घर ते फिरोज मुल्ला घरापर्यंत बंदिस्त गटर करणे.

पान नं.2 वर

10.विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.11 मधील फारुख आत्तार घर ते फिरोज मुल्ला घरापर्यंत बंदिस्त गटर व रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.

11.विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.11 मधील मळणगांवे घर ते शिवाजी कुंभार घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.

12.विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.11 मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर अंतर्गत आर.सी.सी. गटर करणे.

13.विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.11 मधील जूना होगलवाडी रोड अमोल देशमुख घर ते शिवसंगम मार्ग ते ॲड. तानाजी कदम घरापर्यत ते आंबेडकरनगर न. पा. शाळा नं 6 ते विठ्ठल विश्वनाथ कांबळे घरापर्यत स्ट्रिट लाईट बसविणे.

14.विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.05 मधील नेहरुनगर ते डॉ.लोखंडे हॉस्पीटलकडे जाणा-या रस्त्यालगत ओढयापर्यंत विद्युत पोल उभा करणे.

15.विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र.05 मधील मनोज भंडारे घर ते मारुती मंदिरपर्यंत रस्ता व गटर करणे.

तरी वरील कामांस महाराष्ट्र लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना / नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना / महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत अनुदान सन 2024-2025 मधील जिल्हा वार्षिक योजना निधीतून घेणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

तसेच सदर कामांपैकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेमधील कामांना मंजूरीकरीता महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.:नगरो-2015/प्र.क्र.232/नवि-33 मंत्रालय, मुंबई – 400032 दि. 16/05/2016 नुसार खालीलप्रमाणे सुधारणात्मक कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

1. नगरपरिषदेमध्ये व्दिनोंद लेखा पध्दतीचा अवलंब करणे.
2. नगरपरिषदेच्या कामकाजाचे पूर्ण संगणकीकरण करणे.
3. मालमत्ता कर विषयक विविध प्रकारच्या सुधारणा करणे.
4. नगरपरिषद हद्दीमध्ये पर्जन्य जल संचय (Rain Water Harvesting) करणे.
5. नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रात पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे.

तरी वरीलप्रमाणे सुधारणात्मक कार्यक्रम राबविणेस या ठरावाद्वारे मान्यता देणेत येत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 27/01/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.166

विषय – विटा नगपरिषद हद्दीतील सि.स.नं.1 मध्ये नगरपरिषद मालकीच्या जागेस गेट बसविणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दिनांक 27/01/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगपरिषद हद्दीतील सि.स.नं.1 मध्ये नगरपरिषद मालकीच्या जागेस गेट बसविणेकामी खालील निविदा दाखल आहेत

| | |
|---|---|
| 1) सुहेल सलिम तांबोळी | अंदाजपत्रकीय दराने |
| 2) अभयसिंह सुभाष जाधव | अंदाजपत्रकीय दराचे 5% जादा दराने |
| 3) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे | अंदाजपत्रकीय दराचे 9% जादा दराने |

उपरोक्त निविदापैकी सुहेल सलिम तांबोळी यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 27/01/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.167

विषय – नगरपरिषद हद्दीत बाजार वसुली (जागा वापर फि) करिता मक्ता देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी मिळकत व्यवस्थापक यांची दिनांक 24/01/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) नगरपरिषद प्रशासकीय ठराव क्र.154, दिनांक.18/10/2023
3) महाराट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 272 व 273
4) दि.23/12/2023 रोजी प्रसिद्ध करणेत आलेली निविदा.
5) विटा नगरपरिषद पत्र जा.क्र.3546, दि.29/02/2024.

विटा नगरपरिषद हद्दीत भाजी विक्रेते/किरकोळ व्यवसायिक आपला शेतीमाल विक्री करण्यासाठी /व्यवसाय करण्यासाठी नगरपरिषद हद्दीतील जागेचा (भाजी मंडई, रस्ते) वापर करीत असतात. याकामी दैनंदिन बाजार/आठवडी बाजार या दिवशी नगरपरिषदेच्या मालकीचे ओटे/कट्टे, खाद्य विक्री स्टॉल, फळ विक्रेते, फेरीवाले, खाटधारक यांचेकडून बाजार वसुली (जागा वापर फि) वसुली केली जाते.

महाराट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 272 मधील तरतुदीनुसार संदर्भ क्र.2 मधील ठरावानुसार बाजार वसुलीचे दर खालीलप्रमाणे निश्चित केले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | दर र.रु. |
|---|---|---|
| 1 | मोकळी जागा 5 फुट X 5 फुट | 10/- |
| 2 | 5 फुट X 5 फुट पेक्षा जास्त असल्यास | 20/- |
| 3 | फळ विक्रेते धारक | 30/- |
| 4 | खाट धारक | 30/- |
| 5 | हातगाडे धारक | 30/- |
| 6 | खाद्य स्टॉल/गाडे | 30/- |
| 7 | 3/4 चाकी गाडीतून माल विक्रेते | 30/- |

संदर्भ क्र.4 नुसार दैनंदिन बाजार वसुली करण्याकरिता महाराट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 273 (1) नुसार र.रु.30,00,000/- मात्र या आधारभूत किमतीवर 1 वर्षासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती.

पान नं.2 वर

त्यानुसार प्राप्त निविदामधून ज्या निविदाधारकाने आधारभूत किमतीपेक्षा जास्त रकमेची निविदा भरली होती त्याची निविदा मंजूर करून संदर्भ क्र.5 नुसार श्री.गजानन रामचंद्र निकम यांना कार्यादेश देण्यात आला होता.

त्यानुसार श्री.गजानन रामचंद्र निकम यांनी आज पावेतो र.रु.24,50,000/- एवढी रक्कम नगरपरिषदेकडे जमा केली आहे. सदर निविदेची मुदत ही दि.28/02/2025 रोजी संपणार असल्याने पुढील वर्षासाठी नवीन निविदा प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

तरी मागील वर्षीच्या आधारभूत किमतीमध्ये (र.रु.30,00,000/-) 10 % वाढ करून म्हणजे एकूण र.रु.33,00,000/- किंमत ठेवून 1 वर्षांकरिता निविदा मागविणे योग्य वाटते. सदर किमतीपेक्षा जास्त रकमेची निविदा भरणाऱ्या मक्तेदारास मक्ता देणेत येईल.

तरी दैनंदिन बाजार वसुली (जागा वापर फि) करण्याकरिता महाराट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 273 (1) नुसार र.रु.33,00,000/- मात्र या किमतीवर 1 वर्षांकरिता बाजार वसुली (जागा वापर फि) करीता मक्ता देणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा